# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/ D42 221/15

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : १५/११/२०१५

## परिपत्रक

**विषयः- उद्योग संजीवनी योजना-२०१५**
**विना परवाना औद्योगिक कारणासाठी पोटभाडयाने दिलेल्या प्रकरणी करावयाच्या कारवाईबाबत**
**संदर्भः- दि. २८.०९.२०१५ रोजीच्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीमधील ठराव क्र. ५५१८**

महामंडळाच्या खालील नमूद केलेल्या परिपत्रकातील धोरणानुसार औद्योगिक भुखंडावरील इमारतीमधील बांधीव क्षेत्र पोटभाडयाने देण्याकरीता त्या-त्या वर्षीच्या प्रचलित दराच्या टक्केवारी प्रमाणे पोटभाडे शुल्क आकारणी करण्यात येते-

| परिपत्रक | दर प्रती चौ.मी. प्रती वर्ष | विना परवाना क्षेत्रासाठी दंडनीय दर प्रती चौ.मी. प्रती वर्ष |
|---|---|---|
| परिपत्रक दिनांक १४.०८.१९९८ | प्रचलित दराच्या १० टक्के | |
| परिपत्रक दिनांक ०५.०३.२००७ | प्रचलित दराच्या ३ टक्के | ५ पट दर |
| परिपत्रक दिनांक २९.१०.२००९ | प्रचलित दराच्या ५ टक्के | ५ टक्के |
| परिपत्रक दिनांक २६.०५.२०१० | प्रचलित दराच्या ३ टक्के | ५ टक्के |
| माहिती तंत्रज्ञान उद्यानातील भूखंड पाटभाडयाने देणेकरीता परिपत्रक दि. ०५.०३.२०१३ | प्रचलित दराच्या १ टक्का | |

तथापि, विना परवाना पोटभाडयाने दिलेल्या क्षेत्रावर नियमानुसार पोटभाडे शुल्क व दंडाची रक्कम आकारणी व्यतिरिक्त या रक्कमेवर व्याज आकारणी करणेत येते आणि अशा प्रकारे येणा-या मोठया रक्कमेचा भरणा करण्यास भूखंडधारक तयार होत नाहीत तसेच रक्कम भरण्यामध्ये भूखंडधारकांस सवलत/हप्त्याने रक्कम भरण्याची तरतूद नाही. त्यामुळे अशी प्रकरणे प्रलंबित राहून प्रशासकिय काम वाढते व वसुलीही होत नसल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर अशा भूखंडधारकांना देखील विशेष बाब म्हणून खालीलप्रमाणे योजना लागू करण्यात येत आहे-

- **सदर योजना औद्योगिक भूखंडावर केवळ औद्योगिक वापरासाठीच विना परवाना पोटभाडयाने दिलेल्या क्षेत्रास लागू राहील.**
- पोटभाडयाने दिलेल्या क्षेत्राकरीता त्या त्या वेळच्या धोरणाप्रमाणे पोटभाडेशुल्क, त्यावरील व्याज व दंडनीय रक्कमेत ५० टक्के सूट देण्यात येत आहे.

- **जे भूखंडधारक उपरोक्त योजनेचा लाभ घेणार नाहीत, त्यांचेबाबत विशेष मोहिम राबवून सर्व देयक रक्कम वसुली करुन करारनाम्यातील तरतुदींप्रमाणे भूखंड महामंडळाचे ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.**

- **महामंडळाची पूर्व परवानगी न घेता भूखंडावरील Automobile Body Building/Spare parts या मूळ उद्योगाशी निगडीत Office/Showroom या पूरक वाणिज्यीक कारणाकरीता वापर केला असल्यास अथवा पोटभाडयाने दिले असल्यास अथवा औद्योगिक बांधीव क्षेत्र वाणिज्यीक वापरासाठी पोटभाडयाने दिले असल्यास असे भूखंडधारक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असणार नाहीत.**

- **ज्या भूखंडधारकांनी पोटभाडे शुल्क, दंडाची रक्कम व त्यावरील व्याज यापूर्वीच भरणा केलेले आहे त्यांना या योजनेचा लाभ घेण्यास पात्र होणार नाहीत अथवा त्यांची रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.**

सदर परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची जबाबदारी सर्व संबंधितांवर राहील, तसेच यामधून महामंडळाचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदरहू परिपत्रक विधी विभागाच्या सहमतीने व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(ए.एल.जऱ्हाड)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.